बीड । सोमवार
१७.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३११
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 

# धस-मुंडे भेटीने काही फरक पडत नाही

मुंबई । वृत्तसेवा

भाजपचे आमदार सुरेश धस यांनी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यानंतर एकच खळबळ उडाली. धस यांच्यावर ते मॅनेज झाले, ते फितूर झाले अशी टीका होऊ लागली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या भेटीत गैर काय? एखाद्या आजारी व्यक्तीला भेटायला जाऊ नये का? असे म्हणत धस यांचा बचाव केला. त्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही धस यांनी घेतलेल्या भेटीने काही फरक पडत नसल्याचे सांगत ही विरोधकांची पोटदुखी असल्याचे म्हटले आहे.

## बीड हत्या प्रकरणात मी खंबीर भूमिका घेतली आहे-देवेंद्र फडणवीस



सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर आरोपींच्या अटकेसाठी भाजपचे आष्टीचे आमदार सुरेश धस (डीशीह उ्हरी) यांनी रान उठवले होते. वाल्मीक करासह सर्व आरोपींच्या कुंडल्या, त्यांच्याविरोधातील पुरावे बाहेर काढत फास आवळण्यात महत्वाची भूमिका बजावली. मंत्री धनंजय मुंडे यांच्यावरही या निमित्ताने धस यांनी टीका केली होती. मात्र अचानक त्यांनी धनंजय मुंडे यांची गुप्त भेट घेतल्याने एकच खळबळ उडाली. सुरेश धस मॅनेज झाले, हे प्रकरण आता दाबले जाणार, अशी टीका चोहोबाजूंनी सुरू झाली. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सुरेश धस हे आधुनिक काळातील फितूर असल्याची टीका केली. त्यांनी मराठा समाजाचा आणि देशमुख कुटुंबियांचा विश्वास घात केल्याचा आरोपही त्यांनी केला. धस-मुंडे भेटीची धग कायम असतानाच आज जळगाव दौऱ्यावर असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋरवपर्रींळी) यांनी यावर आपली भूमिका स्पष्ट केली. बीड प्रकरणात आपण गंभीर भूमिका घेतली आहे. त्यामुळे धस-मुंडे यांची भेट झाली असली तरी काही फरक पडत नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. कोण कुणाला भेटले याच्यावर राजकारण होत असेल तर ते लोकशाहीमध्ये योग्य नाही, लोकशाहीमध्ये संवाद हा सुरू राहिला पाहिजे. बीडमधील हत्याप्रकरणात मी खंबीर भूमिका घेतलेली आहे. खंबीर भूमिका घेत असताना त्या माध्यमातून संवाद तोडून टाकायचा असे करण्याची आवश्यकता नाही. धनंजय मुंडे हे ▶▶पान २ वर

# बीडच्या पाणीपुरवठ्याप्रश्नी आ.संदीप क्षीरसागरांकडून पुन्हा अजितदादांची भेट

जुन्नर । वृत्तसेवा

## उन्हाळ्यापूर्वी सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी आ.क्षीरसागरांचा पाठपुरावा सुरू

बीड शहराच्या सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. आताही रविवारी (दि.१६) रोजी जुन्नर येथे आ.संदीप क्षीरसागर यांनी दुसर्यांदा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची याच संदर्भात भेट घेतली. बीड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी अमृत अटल योजना आणि बिंदुसरा धरण आणि माजलगाव बॅकवॉटरमध्ये पाण्याची पुरेशी उपलब्धता आहे. मात्र नगरपालिकेकडे महावितरण कंपनीचे ३६ कोटी रुपयांचे वीजबिल थकलेले आहे. त्यामुळे अमृत अटल पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक असलेले नवीन वीज कनेक्शन देण्यात येत नसल्याने पाणी उपलब्ध असताना देखील बीड शहराला पाणी मिळत नाही. याबाबत



आ.संदीप क्षीरसागर यांनी गेल्या अनेक दिवसांपासून विधीमंडळ अधिवेशनात, शासनाकडे, प्रशासकीय स्तरावर आणि न्यायालयात देखील हा बीडकरांचा मुलभूत प्रश्न मांडला आहे. सुयोगाने कर्तव्यदक्ष नेते ना.अजित ▶▶पान २ वर

# आ.धस मंत्री धनंजय मुंडेंच्या विरोधात आक्रमक

मुंबई । वृत्तसेवा

## कृषि विभागाकडे मागितली ‘त्या’ निर्णयांची माहिती



मंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात भाजपचे आमदार सुरेश यांनी पुन्हा एकदा हत्यार उपसल्याचे पाहायला मिळत आहे. सुरेश धस यांनी कृषि विभागाचे सचिव विकासचंद्र रस्तोगी यांना पत्र लिहून तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी घेतलेल्या निर्णयांची माहिती द्या अशी मागणी केली आहे. तेलबियांच्या उत्पादकता वाढीसंदर्भातील निर्णयांची माहिती सुद्धा सुरेश धस यांनी आता या पत्रामधून मागवली आहे. तर २०२० ते २०२५ पर्यंतच्या पत्रव्यवहाराची माहिती द्या, अशी मागणी करत सुरेश धस यांनी प्रधान सचिवांना हे पत्र लिहिले आहे. तसेच कापूस, सोयाबीन, तेलबियांची उत्पादकता वाढविण्यासाठी केलेल्या पत्रव्यवहाराची माहिती द्या, अशी मागणी धसांनी ▶▶पान २ वर

### तलवाड्याजवळ शेतीचा वाद

# शेतकऱ्याची विष घेवून आत्महत्या

तलवाडा । प्रतिनिधी

शेतीच्या वादातून शेतकऱ्याने वीष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना राहेरी (ता. गेवराई) येथे घडली. दरम्यान संतप्त नातेवाईकांनी मानसिक त्रास देणाऱ्या संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल करावा अशी मागणी करत जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भुमिका घेतली होती. शेवटी आज सकाळी नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला. गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस ठाणेंतर्गत राहेरी येथील शेतकरी उध्दव अर्जुन लाड (वय ४५) यांनी काल दुपारी ३ च्या सुमारास विष प्राशन केले होते. त्यांना तात्काळ गेवराईच्या उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांनी बीड येथील जिल्हा रूग्णालयात ॲडमिट करण्यात आले. आज सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास उपचार सुरू असतांना उध्दव लाड यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, आई असा परिवार आहे. दरम्यान मयत उध्दव लाड आणि त्यांचे भाऊ बाळासाहेब लाड यांनी राहेरी येथील गट क्र. १४० मधील खरेदी खत क्रमांक ४८५२/२०२४ दि.५/९/२०२४ च्या खरेदीखताची चौकशी करून न्याय द्यावा अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे ▶▶पान २ वर

# पवनचक्की कंपन्यांचा मनमानी कारभार

तलवाडा । प्रतिनिधी



बीड तालुक्यातील बालाघाटावर पवन ऊर्जा प्रकल्प कंपन्या संच उभारताना नियम व अटींचे पालन करत नसुन मनमानी कारभार करत आहेत.त्यामुळे पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात जमीन खरेदी व्यवहारात गैरप्रकार तसेच संपादीत जमिनीपेक्षा जास्तीचे अतिक्रमण करणे, ठरलेला जमिनीचा ▶▶पान २ वर



पाटोदा : तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील शेतकरी भाऊसाहेब अनुरथ म्हस्के यांनी रोजगार हमी योजनेअंतर्गत शेततळे करून शेततळ्याच्या माध्यमातून जवळपास चार एकर क्षेत्र गेल्या चार ते पाच वर्षांपासून बागायती करून कलिंगड, खरबूज, कांदा, टोमॅटो, ढोबळी मिरची इत्यादी फळभाज्या व पालेभाज्या उत्पादन घेऊन मोठ्या आर्थिक उलाढालीचा ते दरवर्षी उपक्रमशील शेती करून पाटोदा तालुक्यात एक आगळावेगळा आदर्श शेतकऱ्यांपुढे दाखवून दिलेला आहे. आज आ.सुरेश धस यांनी टरबूज प्लॉटची पाहणी करत आधुनिक यंत्राद्वारे फवारणी करण्याचे प्रात्यक्षिक अनुभवले.







# मांजरसुंबा,कोळवाडी घाटात अपघात

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात दिवसेंदिवस अपघाताच्या प्रमाणात वाढ होत असून, दिनांक १६ रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मांजरसुंबा कोळवाडी घाटाच्या पायथ्याशी पाच वाहने एकमेकाला धडकली. सायंकाळी मांजरसुंबा कडून बीड कडे हरभरा घेऊन येणारा कंटेनर कोळवाडी घाटात अचानक समोरील वाहनाने ब्रेक लावल्याने ट्रक,आयशर टेम्पो, अशोक लेलँड, कार,ऑटो रिक्षा ही वाहने एकमेकाला धडकुण विचित्र अपघात झाला. या अपघातात चार ते पाच जण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी बीड शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मालवाहू ट्रक मधील हरभरा पोते रस्त्यावर पडल्याने काही काळ ▶▶पान २ वर



# लढाईत जिंकणाऱ्या मराठ्यांचा तहात हारण्याचा शापित इतिहास

थोडे इतिहासा मध्ये डोकाऊण पाहुयात म्हणजे सध्याच्या चालु घडामोडीचा संदर्भ लक्षात येईल.तर चला मग थोडे भुतकाळात जाऊयात इ.स. १७६१ या दिवशी मराठ्यांचा निर्णायक पराभव झाला. हे पानिपतचे तिसरे युद्ध म्हणून ओळखले जाते. यानंतर मराठा साम्राज्याचा विस्तार थांबून विभाजन होण्यास सुरुवात झाली. १७६१ नंतर पाच मराठा राज्ये स्वायत्त झाली. इ.स. १७७५ मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीबरोबर पहिले युद्ध लढण्यात आले. यात मराठा सरदारांनी एकजूट होउन इंग्रजांचा सामना केला परिणामी अनेक ठिकाणी इंग्रजांचा पराभव झाला. इ.स. १८०२ मध्ये इंग्रजांनी बडोद्याच्या वारसदाराला अंतर्गत वादात मदत केली. बडोद्याला वेगळे राज्य म्हणून मान्यता देऊन त्याबदल्यात त्यांनी इंग्रजांच्या प्रभुत्वाची पावती मिळवली. दुसऱ्या इंग्रज–मराठा युद्धात (इ.स. १८०३–इ.स. १८०५) मराठ्यांनी स्वातंत्र्य तर वाचवले पण ओडिसा, गुजरात इत्यादी भाग गमवावे लागले. तिसऱ्या इंग्रज–मराठा युद्धात (इ.स. १८१८) मराठ्यांना पराभव पत्करावा लागला आणि जवळजवळ संपूर्ण भारतावर इंग्रजांची सत्ता आली. यात पुणे आणि देशावरील इतर भाग कोल्हापूर आणि सातारा यांचा अपवाद वगळता इंग्रजांच्या हातात गेले. ग्वाल्हेर, इंदूर आणि नागपूरही इंग्रजांच्या राज्यात 'स्वतंत्र संस्थाने' म्हणून सामील झाले. सोनीया गांधींच्या विदेशी मुद्यावरुण शरद पवारांचे बंड आणि पवारानां चालुन आलेली संधी. शिवसेनेत ४५ मराठा आमदार असूनही सत्तेची सूत्रं मराठा नेतृत्वाकडे नव्हती. ग्रामीण भागातील श्रीमंत शेतकरी जातीही अस्वस्थ होत्या. मराठा जातींतली ही फूट शिवसेनेला फायदेशीर ठरत होती. महाराष्ट्राच्या बदलत्या अर्थव्यवस्थेत शेतकरी जातींचं महत्त्व कमी होऊ लागलं होतं. या पार्श्वभूमीवर शरद पवारांनी सोनिया गांधींना विरोध करत १० जून १९९९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. शरद पवारांनी सोनिया गांधीं यांच्या विदेशी मुद्यावर उपस्थित केलेला प्रश्न भारतीय राजकारणातील इतका प्रभावी मुद्दा होता की, जर शरद पवार हे या मुद्यावर ठाम राहिले आसते तर कांग्रेस विरोधी विचारांच्या भाजपासहीत इतर प्रादेशीक पक्षांच्या पाठींब्यावर शरद पवार हे १०१ % भारताचे पंतप्रधान झाले आसते आसे राजकीय क्षेत्रातील तज्ञांचे ठाम मत होते. दरम्यान विदेशी मुद्यावरुण बंड केल्यानंतर ६ महिण्यां नंतर झालेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत लढाई जिंकून देखील शरद पवारांनी सोनिया गांधीं सोबत तह करुण पंतप्रधान पदाची संधी गमावली. मराठा आरक्षण,अंतरवाली सराटी,मनोज जरांगे पाटील,यश टप्यात आसताना तह आणि टांगा पलटी घोडे फरार. अनेक दशका नंतर कधी नव्हे ते मराठे प्रचंड संख्येने एकत्र आले आणि मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी डोळे झाकुन तन मन धनाणे खंबीरपणे पाय रोवून उभे राहिले,मनोज जरांगे पाटील जी बोलतील ति पुर्वदिशा समजु लागले,सामान्य तर सोडा परंतु राजकिय सामाजीक धार्मीक क्षेत्रातील मान्यवर देखील जरांगे पाटील यांच्या प्रभावाखाली आले. दरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत प्रस्थापीत सत्ताधारी पक्षाच्या विरोधात रान उठवले आणि यामध्ये त्यांना यश देखील आले,लागलीच चार महिण्यां नंतर विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आणि मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण समिती निवडणुका लढणार असल्याचे जाहिर केले. लोकसभा निवडणुकीत लागलेले धक्कादायक निकाल पाहता मराठा समाजातील राजकीय क्षेत्रात करीअर



करणाऱ्या अनेकांनी त्यांच्या राजकीय पक्षांना रामराम ठोकुण अंतरवली सराटीची वाट धरली आणि मनोज जरांगे यांच्या आरक्षण स्थळी उमेदवारीच्या अपेक्षेणे तळ ठोकुन बसले. वातावरण पोषक परिस्थिती आसताना देखील मनोज जरांगे पाटील यांनी यश टप्यात दिसत आसताना मराठा तरुनांनां आमदार झाल्यासारखे वाटत आसताना सर्व तयारी झालेली आसताना ऐण वेळी अनपेक्षितपणे माघार घेऊण मराठ्यांचा करेक्ट कार्यक्रम उरकुण टाकला आणि मराठ्यांनी पाहिलेल्या स्वपन्नांवर पाणी फिरवले ! क्षणार्धात होत्याचे नव्हते करुण टाकले ! आणि परत एकदा मराठे सैरभैर होऊण पळत सुटले परत एकदा मराठ्यांच्या नशीबाचे पानीपत झाले परत एकदा आरक्षणाच्या लढाईत जिंकत आलेले मराठे जरांगे पाटील यांनी केलेल्या तहात हारले. आगोदर प्रमोद महाजन विलासराव देशमुख आणि गोपीनाथ मुंडे यांच्या क्रमश:झालेल्या आकस्मित मृत्यु मुळे मराठवाड्यात कधी नव्हे ती राजकीय क्षेत्रात सर्वसमावेशक नेतृत्वाची मोठी पोकळी निर्माण झाली होती. दरम्यान संतोष देशमुख,सोमनाथ सुर्यवंशी,कळसे मास्तर संगीत डिघोळे,किशोर फड,महादेव मुंडे,ते बापु आंधळे,यांचे खुन प्रकरणे,आणि वाळुमाफीया, राखमाफीया, भुमाफीया,बीड जिल्ह्यातील बहुचर्चित मल्टिस्टेट घोटाळे,आणि जिल्ह्यातील बिघडलेल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा उडलेला बोजवारा व राजकीय क्षेत्रातील बोकाळलेला भ्रष्टाचार, वरील सर्वसमावेशक मुद्यांना हात घालुन सुरेश धस यांनी सभागृहात आणि मिडीयात आवाज उठवला यातच त्यांची बोलण्याची शैली साधे राहणीमान,रांगडे व्यकतीमत्व,आणि बोलण्यातील खरेपणा हा जनतेला एवढा भावला की मराठवाड्यातील राजकीय क्षेत्रातील निर्माण झालेली सर्वसमावेशक नेतृत्वाची पोकळी सुरेश धस यांच्या रुपाने भरुण निघेल आशी लोकांमध्ये भावना निर्माण झाली होती. दरम्यान सुरेश धस यांनी उभारलेल्या लढ्याचे यश टप्यात आलेले दिसत आसताना आणि सुरेश धस यांच्या नेतृत्वावर राज्यभर निर्विवाद शिकामोर्तब होण्याची संधी निर्माण झालेली आसताना सुरेश धसांच्या भुमिकेवर प्रश्न चिन्ह निर्माण होणारी घटणा खुद सुरेश धसांच्या हातुन घडली,आणि परत एकदा मराठे एका चांगल्या नेतृत्वास मोठे झालेले पाहण्या पासुण मुकले,परत एकदा निराशा पदरी आली परत एकदा लढाईत जिंकलेले सुरेश धस तहा मध्ये हारले. तसं पाहिले तर एकनाथ शिंदे देखील याच कैटेगरी मध्ये आलेले आहेत विधानसभेत युतीला मिळालेले यश हे निर्विवाद त्यांचेच होते एकनाथ शिंदे मुख्यमंत्री पदावर दुसऱ्यांदा बसतील याच भावनेतुन मराठ्यांनी युती च्या उमेदवारांना भर भरुण मते दिली परंतु देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांचा करेक्ट कार्यक्रम उरकुण लढाईत जिंकलेल्या एकनाथ मामा शिंदेचा तहात पराभव करून टाकला.! लढाई मध्ये जिंकून तहा मध्ये हारने हा मराठ्यांचा शापीत इतिहास आहे,यावरुण हे पुन्हा पुन्हा दिसुण येते...

# जिल्हा वाहतुक शाखेची उल्लेखनीय कामगिरी

## चोरीचे वाहन २४ तासाच्या आत सापडून दिले

बीड, (प्रतिनिधी):– शहरात सद्यस्थितीला पोलीस अधिक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांच्या सहकार्याने सध्या वाहतुकीचे नियम मोडणार्यांवर पोलीसांनी चांगलीच कार्यवाही सुरु केली असून गेल्या आठवड्यातच २०० रिक्षाचालकांवर दंडात्मक स्वरुपाची कार्यवाही केली होती त्यामुळे रिक्षाचालकांना देखील वाहतुकीच्या नियम मोडल्यामुळे तसेच कागदपत्रे नसल्याने कार्यवाहीचा चांगलाच दणका बसला होता.दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी विशाल संजय कुलकर्णी (रा.आदित्य नगर, बीड) यांची मोटारसायकल २४ तासाच्या आत सापडून देण्याची उल्लेखनिय कामगिरी जिल्हा वाहतुक शाखेने केली आहे त्यामुळे नागरिकांत पोलीसांच्या कामगिरीविषयी समाधान व्यक्त होत आहे. याबाबत माहिती अशी की, दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी विशाल संजय कुलकर्णी (रा.आदित्य नगरी, बीड) यांची मोटारसायकल काल शनिवार रोजी अज्ञात चोराने चोरुन नेली होती ती मोटारसायकल जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, वसुदेव मिसाळ, बजरंग कुटुंबरे, सोबत पोलीस हवालदार



राजाभाऊ तांदळे, महिला पोलीस शिपाई अनिता पवार, पोलीस हवालदार नितीन शिंदे, विष्णु काकडे, पोलीस नाईक अजिनाथ मुंडे, पोलीस कॉन्स्टेबल वसीम शेख व चालक पोलीस हवालदार हरके यांच्या टीमने शहरातील साठे चौकात वाहतुक नियमांचे उल्लंघन करत असतांना सदरील संशयित मोटारचालक सुनिल गणपत शिंदे (रा.वासनवाडी) यास पोलीसांनी पकडले व त्याच्यावर दंडात्मक कारवाई करत असतांना डिवायएसवर मुळ मालक यांचा मोबाईल नंबर मिळाला त्यांना भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता त्यांनी सांगितले की कालच माझे वाहन चोरीला गेले याबाबत मी शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिलेली आहे त्यानंतर सदरील वाहतुक शाखेच्या पोलीस अधिकारी आणि कर्मचार्यांनी चोरीची पडताळणी करत पुष्टी केली व आरोपीस पोलीस स्टेशन शिवाजीनगर यांच्या ताब्यात दिले. यामुळे वाहन चोरी करणार्या आरोपींचे चांगलेच धाबे दणाणले असून नागरिकांतून पोलीसांविषयी समाधान व्यक्त केले जात आहे.

# आपला परिवाराच्या मनीषा पवार यांचा देहदानाचा संकल्प

बीड, (प्रतिनिधी):–जिवंतपणी सामाजिक कार्यात योगदान दिले. मात्र मरणानंतरही देहाचा उपयोग समाजासाठी व्हावा या उदात्त हेतूने नेकनूर येथील आपला परिवारच्या संचालक मनीषा पवार यांनी देहदानाचा संकल्प केला आहे. ज्येष्ठ समाजसेविका विना गोखले यांच्या वाढदिवसानिमित्त पवार यांनी हा संकल्प केला आहे. या संबंधीचे प्रतिज्ञापत्र १० फेब्रुवारी रोजी अंबाजोगाईच्या स्वा.ती.ग्रा.शा.वै.म. शरीर रचना शास्त्र विभाग प्रमुखांच्या सहीनिशी मनिषा पवार यांना दिले आहे. ज्येष्ठ समाजसेविका



विना गोखले या आर्टिस्ट्री संस्थेच्या माध्यमातून सामाजिक संस्थांसाठी मोठे काम करत आहेत. पुणे मुंबई व ठाणे येथे विविध विषयात काम करणाऱ्या सामाजिक संस्थांना सहाय्य करण्यासाठी 'देणे समाजाचे' हा उपक्रम गेल्या वीस वर्षांपासून चालवत आहेत. या माध्यमातून निमशहरी,ग्रामीण दुर्गम व अतिदुर्गम भागातील सामाजिक संस्थांना मदत करणे हा मुख्य उद्देश असतो. ८ जानेवारीला त्यांचा वाढदिवस झाला. याचे औचित्य साधून ७ जानेवारी रोजी मनिषा पवार यांनी देहदानाचा फॉर्म भरून दिला होता. या संबंधीचे प्रतिज्ञापत्र १० फेब्रुवारी रोजी अंबाजोगाईच्या स्वा.ती.ग्रा.शा.वै.म.शरीर रचना शास्त्र विभाग प्रमुखांच्या सहीनिशी मनिषा पवार यांना दिले आहे. मनीषा पवार या नेकनूर जवळील कळसंबर येथे आपला परिवार वृद्धाश्रम चालवत आहेत. इथे अंध अपंग निराधार व बेघर आजी–आजोबांची सेवा व सुश्रुषा केली जाते.या संस्थेला शासनाचे कसलेही अनुदान नसून फक्त लोकसहभागावरच सदरील संस्था चालते.या कामी त्यांचा परिवार त्यांना मदत करतो.मृत्यू पश्चातही आपल्या शरीराचा समाजाला उपयोग व्हावा म्हणून त्यांनी हा निर्णय घेतला असून,त्यांच्या कुटुंबीयांनी या निर्णयाला सहमती दर्शविली आहे.या निर्णयामुळे समाजातून त्यांचे कौतुक होत आहे.

# शासकीय शिवजयंती तिथीनुसार साजरी व्हावी!

भारतीय संस्कृतीत वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार म्हणजेच तिथीनुसार साजरे करण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. आजही अनेक घरांत पिढ्यानपिढ्या ही प्रथा जपली जात आहे. बदललेली शिक्षणपद्धती, इंग्रजी भाषेला दिले गेलेले अवास्तव महत्व, तरुणवर्गावर पाश्च्यात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव आणि त्याअनुषंगाने बदलत गेलेले राहणीमान यांमुळे दैनंदिन जीवनात तिथीचा वापर करणे हळूहळू कमी होत गेले. आजमितीला तिथीचा उल्लेख केवळ लग्नपत्रिकांवरच पाहायला मिळतो. या भारतभूमीत होऊन गेलेले देवतांचे अवतार, संत महात्मे यांचे प्रकटदिन, जयंती आणि पुण्यतिथी हे आजही तिथीनुसारच साजरे केले जातात, मकर संक्रांत वगळता हिंदू धर्मातील समस्त सण–उत्सवही तिथीवरच आधारित आहेत. या महाराष्ट्रभूमीत जन्माला येऊन साऱ्या विश्वाला आदर्श राज्यकारभाराचा गुरु मंत्र देणारे, आपल्या अतुल पराक्रमाने, अचाट बुद्धिचातुर्याने, कुशल रणकौशल्याने आणि प्रबळ इच्छाशक्तीने शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्रातील जनतेसाठी अवताराहून कमी नाहीत त्यामुळे त्यांचा जन्मदिन तिथीनुसारच साजरा व्हावा यासाठी अनेक संघटना, संस्था आणि इतिहासप्रेमी आग्रही आहेत. समाज ऐक्यासाठी आणि लोकजागरणासाठी लोकमान्य टिळकांनी शिवजयंती सुरु केली तीही तिथीनुसारच. मात्र त्या काळापासून छत्रपती शिवरायांच्या जन्मतिथीबाबत बराच घोळ आहे. शिवरायांची जन्मतिथी इतिहासकालीन अनेक पुराव्यांमध्ये वेगवेगळी असल्याचे दिसून येते. शिवरायांच्या जन्मतिथीचा हा वाद १०० वर्षांहून अधिक काळ सुरु होता अखेर महाराष्ट्र शासनाने शिवजयंतीची तारीख निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन केली. २००१ साली या समितीने इतिहासकालीन दस्तावेज आणि इतिहासतज्ज्ञांचे मत विचारात घेऊन शिवाजी महाराजांची जयंती म्हणून फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० या तारखेवर शिक्कामोर्तब केले. या तारखेबाबतही एक घोळ झाला आहे. फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ या तिथीला अनुसरून निश्चित केलेली १९



फेब्रुवारी ही तारिख ज्युलियन कॅलेंडरनुसार आहे. ज्युलियन कॅलेंडर आता कालबाह्य झाले असून सध्याची इंग्रजी कालगणना ही ग्रेगेरिअन कॅलेंडरनुसार प्रचलित आहे. ग्रेगेरिअन कॅलेंडरनुसार फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ या तिथीला १ मार्च १६३० ही इंग्रजी तारीख येते. १९ फेब्रुवारी ही तारिख राज्यशासनाने गठीत केलेल्या समितीने निश्चित केल्यामुळे सध्या शासकीय शिवजयंती १९ फेब्रुवारीलाच साजरी केली जाते. शासनाने जरी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी करण्याचे निश्चित केले असले, तरी राज्यातील बहुतांश भागात आजही शिवजयंती तिथीनुसार साजरी केली जाते. छत्रपती शिवाजी महाराज भारतातील असे एकमेव राजे असावेत ज्यांची जयंती दरवर्षी इंग्रजी तारखेप्रमाणे आणि हिंदू कालगणनेनुसार तितक्याच जल्लोषात साजरी केली जाते. ज्या शिवरायांनी आपले अखंड आयुष्य हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेसाठी वेचले त्यांची जयंती ख्रिस्ती कालगणनेनुसार साजरी व्हावी हे खरेतर मनाला खटकणारे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना परकीय कालगणना झिडकारून ''राज्याभिषेक शक'' ही स्वकीय कालगणना चालू केली. परकीय चलनाचा वापर थांबवून स्वकीय चलनाची निर्मिती केली. इतकेच नव्हे, तर परकीय भाषा, संस्कृती, आणि तिची प्रतिके झुगारून स्वकीय भाषेत राज्यकारभार केला, स्वसंस्कृतीचे रक्षण केले. मराठी भाषेच्या शुद्धीकरणासाठी शिवरायांनी केलेल्या प्रयत्नांची इतिहासात सविस्तर नोंद आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे प्रत्यक्ष देव किंवा अवतार नसले, तरी त्यांच्यामुळे हिंदूंच्या मंदिरातील देव शाबूत राहिले, त्यामुळे हिंदूंना ते देवाच्या स्थानी आहेत. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी दाखवलेले अफाट शौर्य हे अवतारी कार्याहून कमी नाही, त्यामुळे हिंदूंना ते रामकृष्णादी अवतारांप्रमाणेच पूजनीय आहेत. शिवजयंती देव, अवतार आणि संत यांच्याप्रमाणे तिथीनुसार म्हणजेच फाल्गुन वद्य तृतियेला साजरी केली जावी ही मागणी गेली अनेक वर्षे शिवप्रेमींकडून लावून धरली जात आहे. आजमितीला शिवजयंती केवळ राज्याच्या सीमेपुरती मर्यादित राहिलेली नाही. साता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी नागरिक बहुसंख्येने आहेत त्या ठिकाणी शिवजयंती जल्लोषात साजरी केली जाते त्यामुळे ती इंग्रजी तारखेनुसार साजरी व्हायला हवी असे मत राज्याने गठीत केलेल्या समितीतील काही सदस्यांनी व्यक्त केले होते. खरेतर केवळ शिवजयंतीच नव्हे तर गणेशोत्सव, दिवाळी, होळी यांसारखे सण आणि उत्सव भारतीय नागरिक ज्या ज्या देशांत आहेत त्या त्या ठिकाणी प्रतिवर्षी उत्साहाने साजरे केले जातात. हे सारे सण तिथीनुसार साजरे होऊ शकतात मग शिवजयंतीच्या बाबतीत इंग्रजी तारखेचा अट्टाहास संयुक्तिक वाटत नाही. आज राज्यावर शिवसेना आणि भाजप या शिवप्रेमी आणि हिंदुत्ववादी पक्षांचे शासन आहे. शिवसेनेच्या स्थापनेपासून पक्षाच्या शाखाशाखांतून शिवजयंती उत्सव हे तिथीनुसारच साजरे करण्यात आले आणि यापुढेही ते तिथीप्रमाणेच साजरे केले जातील यात शंका नाही. याआधीही भाजपसोबत सत्तेत असताना शिवजयंती तिथीप्रमाणे साजरी करण्याचा आग्रह शिवसेनेने धरला होता. शिवप्रेमींच्या मागणीखातर गड किल्यांवरील अतिक्रमणाच्या विरोधात कठोर भूमिका घेणाऱ्या माननीय मुख्यमंत्र्यांनी शिवप्रेमींची अनेक वर्षे प्रलंबित असलेली ही मागाणीसुद्धा पूर्ण करावी.

**जगन घाणेकर**
**मो.९६६४५५९७८०**

## पान १ वरून

### धस–मुंडे भेटीने...

राज्याचे मंत्री आहेत, एखादा आमदार एखाद्या मंत्र्याला भेटल्याने कुठलाही फरक पडत नाही. सुरेश धस यांनी देखील सांगितला आहे की, भेट घेतली तरी हेतू एकच आहे की सरपंच देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे. तोच हेतू घेऊन सुरेश धस काम करत आहेत. मात्र, काही लोकांच्या पोटात दुखते, त्यामुळे ते यावर टीका करतात, अशा शब्दात फडणवीस यांनी या भेटीचे समर्थन केले.

### बीडच्या पाणीपुरवठ्याप्रश्नी...

दादा पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद आले असल्यामुळे आ.संदीप क्षीरसागर याविषयी ना.अजितदादांकडे या विषयात न्याय मागत आहेत. आ.क्षीरसागर यांनी याच विषयावर दोन आठवड्यांपूर्वी मुंबई येथे ना.अजितदादांची भेट घेतली होती. आता पुन्हा याच विषयावर आ.क्षीरसागरांनी ना.अजितदादांची रविवारी (दि.१६) रोजी जुन्नर येथे भेट घेतली. यावेळी ना.अजित दादा पवार यांनी विद्युत विभागाचे व्यवस्थापकीय संचालक यांना याविषयी तातडीने मार्ग काढण्यासाठी आदेश दिले आहेत. उन्हाळ्याच्या पूर्वी बीड शहराचा पाणीपुरवठा ना.अजितदादांच्या माध्यमातून सुरळीत होईल आणि गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या बीडकरांच्या मुलभूत सोयीसाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश येईल असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

### आ.धस मंत्री धनंजय...

केली आहे. तर खरेदीच्या प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याच्या वेगवेगळ्या तक्रारी आल्याचं सुरेश धस यांनी पत्रामध्ये म्हटलं आहे. याचबरोबर कृषी मंत्र्यांच्या कार्यालयातील अधिकारी यांचे एकमेकांशी लागेबांधे होते, कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप सुद्धा सुरेश धस यांनी केला आहे.

### तलवाड्याजवळ शेतीचा...

२५ जानेवारी २०२५ रोजी निवेदनाद्वारे केली होती. शेतीच्या प्रकरणात फेर ओढू नका म्हणून उपविभागीय अधिकाऱ्यांनी दि. १२ फेब्रुवारीपर्यंत स्टे दिला होता. मात्र तो स्टे त्यांनी दि.१४ तारखेला आमच्या परस्पर उठविला. त्यानंतर तलाठ्यांनी फेर ओढला. तेंव्हापासून मयत भाऊ उध्दव लाड याने मनस्ताप करून घेतला. त्यातूनच त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे भाऊ बाळासाहेब लाड यांनी सांगितले.

### मांजरसुंबा, कोळवाडी...

वाहतूक कोंडी होऊन वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या, तर हरभरा रस्त्यावर पडल्याने दुचाकीस्वार घसरून पडू लागले होते. या अपघाताची माहिती बीड ग्रामीण पोलिसांना मिळतात तात्काळ अपघात स्थळी जाऊन वाहतूक सुरळीत केली व रस्त्यावरील हरभरा हटवण्याचे काम सुरू केले.तर काही लोकांनी अंधाराचा फायदा घेऊन हरभऱ्याचे पोते लांबवल्याची माहिती

## पान १ वरून

मिळत आहे.

### पवनचक्की कंपन्यांचा...

मोबदला देण्यास टाळाटाळ करणे,कराराचे पालन न करणे आणि जाब विचारला असता शेतकऱ्यांना दमदाटी करणे आदी प्रकारच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत.त्यातच आता शेतकऱ्यांच्या सहमती विना परवाना कोणाताही मोबदला न देताच शेत जमीनीमधुन गट क्रमांक ६५७ मधील ६२ आर शेतजमीनी मधुन रिन्यु ग्रीन एम.एच.पी.वन प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली ही कंपनी पवनचक्की उभारणी करत असुन कंपनीने दि.९ फेब्रुवारी पासून आमच्या शेत जमीनीमधुन माझ्या कुटुंबाच्या संहमतीशिवाय पवनचक्की प्रकल्प उभारण्यासाठी पोकलेन, जेसीबी, जीप,पिक अप अशा विविध वाहनांची वाहतूक करत असुन हे नियमबाह्य व माझ्या शेतजमीनीचे नुकसान करणारे आहे.त्यामुळे सदरील कंपनीस माझ्या शेतातुन वाहतूक करण्यास प्रतिबंध करण्यात यावा अशी लेखी तक्रार रोहित सुरेश ढास यांनी जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक बीड यांना केली आहे. पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात वारंवार तक्रारी येऊन सुद्धा उर्जा प्रकल्प संदर्भातील जिल्हा स्तरीय आणि तालुकास्तरीय संनियंत्रण समित्या केवळ कागदावरच असुन प्रत्यक्षात पिडीत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यास असमर्थ असल्याची खंत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग ऊर्जा आणि कामगार विभागाने दि.२१ ऑक्टोबर २०१३ रोजी पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय नियंत्रण समित्यांची स्थापना केलेली आहे. या समित्यांना पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांबाबत कायदेशीर बाबी व अनिश्चितता तपासणे तसेच पवन ऊर्जा प्रकल्पाशी निगडित असलेल्या जमिनीच्या व्यवहारांमध्ये योग्य व्यावहारिक व मोबदला मिळत असल्याबाबत खात्री करणे. पवन ऊर्जा प्रकल्पाबाबत समितीकडे आलेल्या तक्रारींची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करणे. आणि जिल्ह्यातील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे .त्याचप्रमाणे शेतजमिन मालक ,शेतकरी आणि ग्रामस्थ आणि प्रकल्प विकासक यांच्यामध्ये समन्वय ठेवणे. प्रकल्प उभारण्यासाठी व प्रकल्प कार्यरत राहण्यासाठी स्थानिक स्तरावरचे सर्व प्रकारचे सहाय्य करणे इत्यादी अधिकार यांना दिलेले आहेत. पवन ऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय संनियत्रण समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत तर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद आणि पोलीस अधीक्षक सदस्य आहेत त्याचप्रमाणे उपविभागीय स्तरावर असलेल्या सनियंत्रण समितीमध्ये उपविभागीय अधिकारी अध्यक्ष तर तहसीलदार समन्वयक अथवा सचिव आहेत .मात्र या समित्या केवळ कागदावर असून पवन ऊर्जा प्रकल्प संदर्भात शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे जिल्हा प्रशासन जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप पिडीत शेतकरी करत आहेत.त्यामुळे कागदावरील समित्या प्रत्यक्षात उतरणे गरजेचे आहे असे मत सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर यांनी व्यक्त केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

## दिल्लीतील मराठी साहित्य संमेलनाची प्रसिध्दी जगभरात : मंत्री डॉ. उदय सामंत

**रत्नागिरी । प्रतिनिधी**

मराठीचा आवाज दिल्लीच्या तख्तावर पोहोचविण्यासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने जे प्रयत्न केले त्याचे देखील मनापासून कौतुक करतो आणि त्यांनादेखील मनापासून धन्यवाद देतो. या संमेलनाला मराठी भाषेचा मंत्री म्हणून शुभेच्छा देतो आणि हे संमेलन जगभरामध्ये प्रसिध्द होईल, याची खात्री बाळगतो, अशा शब्दात मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी शुभेच्छा दिल्या.

## मुंबई पोलिस पदी निवड झालेल्या स्नेहा डोंगरेचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार

### ऊस तोडणी करणार मजुराची मुलगी बनली पोलिस



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील आरणवाडी येथील उस तोडणी करणार्या अनुरथ डोंगरे यांची मुलगी स्नेहा अनुरथ डोंगरे ची मुंबई कारागृह पोलीस पदी नुकतीच निवड झाली असुन आरणवाडी जिल्हा परिषद शाळा,ग्रामपंचायत व गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

धारूर तालुक्यातील आरणवाडी येथील उस तोडणी करणार्या अनुरथ डोंगरे यांनी आपली मुलगी स्नेहा डोंगरे हीला उस तोडणी करुन काबाडकष्ट करुन हलाखीच्या परिस्थितीत शिकवले आहे तीने ही आपल्या आई-वडीलाच्या कष्टाची जान ठेऊन शिक्षण घेऊन अभ्यास व मेहनतीच्या जोरावर मुंबई कारागृह पोलीस पदी मिळवले या निवडीबद्दल परिषद शाळा आरणवाडी, ग्रामपंचायत आरणवाडी व गावकऱ्यांच्या वतीने तीचा सन्मान करण्यात आला. यावेळी सेन्हाचे वडील अनुरथ डोंगरे,बबन शिनगरे, मिथुन मस्के, लहु मस्के, बाबुराव मस्के,दत्ता माने, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व आरणवाडी गावचे नागरिक उपस्थित होते.

# संत सेवालाल महाराजांचे विचार प्रेरणा देणारे आहेत : माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर







**बीड । प्रतिनिधी**

अनेक संकटातून सेवालाल महाराजांनी सर्व समाजाला बाहेर काढून एक मोठी क्रांती केली. एक क्रांतीकारी संत म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचे विचार अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहेत असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

श्री संत सेवालाल महाराजांची २८६ वी जयंती सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त दि.१५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, कवी प्रा.अरूण पवार, विरा राठोड, सुरेश राठोड, शंकर राठोड, निता राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, क्रांतीकारी संत सेवालाल महाराज हे भारतातील सर्व बंजारा समाजाचे आराध्य दैवत आहेत. बंजारा समाजामध्ये खर्या अर्थाने जो सामाजिक बदल झाला, जी क्रांती झाली त्या सामाजिक क्रांतीचे आद्यप्रवर्तक म्हणजे क्रांतीकारी संत सेवालाल महाराज आहेत. गोर गणाचे भटके जीवन व भटक्या जीवनातील हाल अपेष्टा, पशुमय अवस्था पाहुण या अवस्थेतून बाहेर काढण्यासाठी सद्गुरू सेवालाल महाराजांनी गोर जन जागृतीचे वृत स्विकारले. या जागृतीसाठी अजीवन ब्रम्हचारी राहण्याचा निर्णय घेतला. परावलंबी दुसर्यांच्या भरवश्यावर राहू नये असा उपदेश सेवालाल महाराजांनी केला. तुमच्यावर लोक भरवसा ठेवतील असे वर्तन करा. दुसर्यांच्या मदतीची अपेक्षा करू नका, जो हिंमत करील त्याला यश आवश्य मिळेल असे सांगून सर्व समाजाचे कल्याण करण्याचे काम त्यांनी केले. म्हणून येणार्या अनेक पिढ्यांना त्यांचे विचार प्रेरणा देणारे आहेत. त्यांचे विचार आत्मसाद करणे गरजेचे आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी बाबासाहेब चव्हाण, अर्जुन चव्हाण, डॉ. जगन्नाथ चव्हाण, आबासाहेब चव्हाण, अंकुश राठोड, बी.एम.पवार, भुषण पवार, सचिन पवार, परमेश्वर चव्हाण, विठ्ठल पवार, सुशिल पवार, बिभीषण राठोड, विलास राठोड यांच्यासह महिला पुरूषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## भारतीय बौध्द महासभेच्या पश्चिम बीड महिला जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते अरुणाताई व्ही.निसर्गन यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

दि.१५ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हा कार्यालय भारतीय बौध्द महासभा बस स्टॅण्ड जवळ बीड येथे केंद्रीय महिला उपप्रमुख आद. रागिनीताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि राज्याध्यक्षा आद.स्वातीताई शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा पश्चिम महिला कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. बैठकीच्या सुरुवातीस रागिनीताई पवार, स्वातीताई शिंदे, माजी राष्ट्रीय संघटक व्ही.एन.निसर्गन, राज्य संरक्षण सचिव अमरसिंह ढाका आदी पदाधिकार्यांच्या हस्ते त.भगवान बुध्द आणि प.पू. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या



प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन धुप-दीपाने पुजन झाल्यानंतर सामुहिक वंदना घेण्यात आली.

प्रमुख पाहुण्यांचे स्वागत झाल्यानंतर बैठकीचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे यांनी केले. नंतर उपस्थित महिलांच्या स्वईच्छेने प्रवेश फॉर्म पूर्ण माहितीसह भरुन घेवून तसेच अनुभव धम्म कार्य, प्रचार प्रसारास वेळ देणार्या महिलांची सर्वानुमते बीड जिल्हा पश्चिम महिला कार्यकारिणी निवडण्यात आली ती पुढील प्रमाणे. महिला जिल्हाध्यक्षपदी आयु.नि. अरुणाताई व्ही.निसर्गन (बीड), सरचिटणीस दीपाली जालिंदर गायकवाड (आष्टी), कोषाध्यक्षा सुजाता प्रशांत वासनीक, उपाध्यक्षा संस्कार कांताबाई प्रभाकर जाधव (बीड), उपाध्यक्षा पर्यटन व प्रचार पद्मीनताई आसाराम गायकवाड, उपाध्यक्षा संरक्षण-, हिशोब तपासणीस आशा अंबादास सोनवणे (रायमोह ता.शिरुर), कार्यालयीन सचिव नंदा शहादेव भंडारे (बीड), सचिव संस्कार, छायाताई सिध्दार्थ सोनवणे (ता.शिरुर), सचिव संस्कार सुरेखाताई प्रकाश सुतार (रायमोह ता.शिरुर), सचिव पर्यटन व प्रचार शोभाताई राजेंद्र साळवी, पौर्णिमा मिलींद निकाळजे, सचिव संरक्षण एसएसडी मणिषाताई परमेश्वर त्रिभूवन (खेर्डा ता.गेवराई), पंचशीलाताई शिवाजी वाव्हळकर (बीड), संघटीका अल्काताई सूर्यकांत त्रिभवन, अवंतिका लिंगेश्वर वासनीक, शोभाताई जालींदर गायकवाड (आष्टी), संगिता दिलीप औसरमल (राक्षसभूवन ता.शिरुर), द्रौपदी मच्छिंद्र कांबळे, सुनंदाताई नाना

## आचार्य भगवंत महाराज पुरी यांचे आज रामनगरमध्ये कीर्तन -उत्रेश्वर महाराज पुर्भे यांचे प्रवचन



**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मागील १३ वर्षांपासून बीड तालुक्यातील रामनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताहात आज सोमवार, १७ रोजी आचार्य भगवंत महाराज पुरी, यांची कीर्तन सेवा होणार आहे. या सप्ताहात भावार्थ रामायण व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे. आज सोमवार, १७ रोजी उत्रेश्वर महाराज पुर्भे यांचे दुपारी प्रवचन होणार आहे. तर रात्री ९ ते ११ यावेळेत आचार्य भगवंत महाराज पुरी यांची कीर्तन सेवा होणार आहे. तरी पंचक्रोशितील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांनी आवाहन केले आहे.

## शिवजयंती निमित्त १९ फेब्रुवारी रोजी मराठा क्रांती मोर्चा व कर्मयोगी परिवाराच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्र आणि देशाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव याही वर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून मराठा क्रांती मोर्चा व कर्मयोगी परिवाराच्या वतीने १९ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक सोळंके पंप परिसर या ठिकाणी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मोठ्या संख्येने शिवभक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. दरवर्षी कर्मयोगी परिवाराच्या वतीने बीडमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. दरवर्षी शेकडो शिवभक्त रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होतात. उद्याच्या १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत हे शिबिर सुरू राहणार असून यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मराठा क्रांती मोर्चा व कर्मयोगी परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.



## रायगड जिल्हा परिषद, अलिबागच्या क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा आनंददायी वातावरणात संपन्न

**रायगड । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेची ग्रामीण उत्कृष्ट वडगाव शाळेने स्पर्धांचे आयोजन उत्तम केले, शिक्षणाधिकारी पुनिता गुरव सर्व टीमचे अभिनंदन.-डॉ.भरत बास्टेवाड यांचे गौरवोद्गार रायगड जिल्हा परिषद, अलिबाग आयोजित जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे रायगड जिल्हा परिषदेची ग्रामीण उत्कृष्ट शाळा,वडगाव ता.खालापूर येथे पहिल्यांदाच भव्य असे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धा दि.१४ फेब्रुवारी,२०२५ रोजी क्रीडा व १५ फेब्रुवारी,२०२५ रोजी व्यक्तिमत्त्व अशा दोन टप्प्यात पार पडल्या.या स्पर्धेसाठी जिल्हा भरातून ३५०० विद्यार्थी,२५० पालक तर १००० शिक्षकांनी सहभाग नोंदवला.यावेळी उदघाटक म्हणून रायगड जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड उपस्थित होते.रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,वडगाव येथे भेट देऊन शाळेच्या मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा या उपक्रमात विभागीय पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल शाळेचे व मुख्याध्यापक सुभाष राठोड व सर्व शिक्षकांच्या कामाचे कौतुक करताना सर्वांचे अभिनंदन केले. त्याच बरोबर व्यासपीठावरून बोलताना डॉ.बास्टेवाड यांनी शिक्षणाधिकारी प्राथमिक पुनिता गुरव यांचे या स्पर्धा उत्कृष्ट पद्धतीने आयोजित केल्याबद्दल अभिनंदन केले. माजी सरपंच गौरीताई गडगे व महादेव गडगे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा करुणा ठोंबरे तसेच रिलायंस, बिर्ला करबन,एस.बी. स्कॅफोल्डिंग, अल्कलाई अमाईन्स,ज्यूबिलियंट,पार्ले,मंडळ इंजिनियरिंग या कंपन्यांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार.दोन दिवसीय या स्पर्धेत बेचकी,लगोरी,लंगडी,दोरीउड्या हे क्रीडा प्रकार तर सांघिक नृत्य,समुहगीत,पथनाट्य व मातीशिल्प या प्रकारात विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सादरीकरण केले.यावेळी महावाचन उत्सव पारितोषिक वितरण करण्यात आले तसेच संत सेवालाल महाराज जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.



# होळमध्ये भगवान बाबा वारकरी संस्थेचा पाया मधुकर महाराज खाडे यांनी रचला : ह.भ.प.महादेव महाराज बोराडे यांचे प्रतिपादन

**केज । प्रतिनिधी**

मधुकर महाराज खाडे यांचे कार्य राजकीय क्षेत्र, कुस्तीसोबत वारकऱ्यांच्या आखाड्यातही होते. त्यांनी अनेक वारकरी, पैलवान घडवले असून होळ येथील भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचा पाया रचला. त्यांच्यामुळे परिसरातही वारकरी संस्था निर्माण झाल्या, त्यांचा आग्रह नसता तर संस्था उभ्या राहिल्या नसत्या. संस्थापक सचिव असूनही त्यांनी एखाद्या सेवेकऱ्याप्रमाणे आयुष्यभर सेवा केली, असे प्रतिपादन औरंगपूर (ता.केज) येथील श्री.जगद्गुरु तुकोबाराय पावनधाम संस्थानचे महंत ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यानिमित्ताने केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह आयोजित केला आहे. ह.भ.प. महादेव महाराज बोराडे शास्त्री हे शनिवारी (दि.१४) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. यावेळी होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ.प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री, पुणे येथील संगीत क्षेत्रातील विद्यावाचस्पती ह.भ.प.प्रा. गणेश





महाराज भगत, पावनधाम संस्थानचे सचिव ह.भ.प.अमोल महाराज जाधव, ह.भ.प.विष्णू महाराज गुळभिले, मृदंगाचार्य राम महाराज निकम, गायनाचार्य हर्षद महाराज दसवडकर यांची उपस्थिती होती.

महादेव महाराज बोराडे यांनी किर्तन सेवेसाठी संत तुकाराम महाराज यांचा देह तंव असे भोगाचे अधीन । याचे सुख सीण क्षणभंगुर ।।१।। अविनाश जोडी देवापायी भाव । कल्याणाचा ठाव सकळही ।।ध्रु.।। क्षणभंगुर हा तेथील पसारा । आलिया हाकारा अवघे नासे ।।२।। तुका म्हणे येथे सकळ विश्रांति । आठवावा चित्ती नारायण ।।३।। हा अभंग घेतला होता. बोराडे महाराज म्हणाले, संत तुकाराम महाराज यांनी उपदेश दिला आहे. त्यांनी म्हटले की, शब्दाची किमया महत्वाची नसते, शब्द कुणाच्या मुखातून निघतो याला अनन्यसाधारण महत्व असते. शब्दामध्ये सामर्थ्य आहे, त्यांचाच उपदेश ऐकावा. समाजाला दिशा दाखविण्यासाठी देवाने संतांना पाठवले. देह हा दुर्लभ आहे. देहाचे सामर्थ्य कळले तो व्यक्ती समर्थ होतो. व्यक्तीकडे अल्पवेळ आहे, मात्र वेळ भरवशाचा नाही. कधीकधी घास मुखात जाईल, इतका श्वास मिळत नाही. हा देह नश्वर आहे, हा विचार आचरणात आणून खाडे महाराजांनी अहोरात्र सेवा केली, असे सांगून श्रद्धांजली अर्पण केली. माणूस जिवंत असताना किंमत कळत नाही हे आपले दुर्दैव आहे. समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांनी म्हटल्याप्रमाणे मोठे होण्यासाठी मरावे लागते. अगदी तसेच वै.पै.मधुकर महाराज खाडे हे न कळलेले आणि अजातशत्रू व्यक्तीमत्व होते. त्यांचा राग-लोभ विसरून पुढे जाण्याचा गुण अनुकरणीय आहे. पावनधाम संस्थानवर त्यांचे येणे विशेष होते. गतवर्षीच्या आयोजित धोंडे जेवण समारंभात नामवंत किर्तनकारांमध्ये खाडे महाराजांचा संस्थानकडून सन्मान केला, याचा मनस्वी आनंद आहे, असे बोराडे महाराज यांनी म्हटले. यावेळी ग्रामस्थ, होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था, औरंगपूर येथील पावनधाम संस्थानचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### किसन महाराज पवार यांचे आज किर्तन

**अंबाजोगाई येथील मुकुंदराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. किसन महाराज पवार यांचे होळ येथे आज (दि.१७) किर्तन होणार आहे. या किर्तनास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील: आ.विजयसिंह पंडित

## वडगाव (चिखली) येथे 1 कोटी 25 लक्ष रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांचा बॅकलॉग भरुन काढण्यासाठी प्रामाणिक काम करत भैय्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील शेती आणि शेतीशी संबंधित असणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कायम प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास गेवराई मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी येथे बोलताना व्यक्त केला.



गेवराई तालुक्यातील वडगांव (चिखली) येथे गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते १ कोटी २५ लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचा शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी भव्य शुभारंभ पार पडला यावेळी ते बोलत होते. यावेळी स्व.माणिकराव काळे पाटील प्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर रा.काँ.पार्टीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, जेष्ठ कार्यकर्ते भागवतराव काळे, पं.स.सदस्य परमेश्वर खरात, जयसिंग जाधव, प्रा.मुकुंद काळे, ड.सोमेश्वर काळे, राजेंद्र वारंगे , कृ.उ.बा.स संचालक अशोक खरात , सरपंच मच्छिंद्र ढेरे , संपादक अमोल वैद्य, पत्रकार विनोद पौळ, बाळू वारे, तीर्थराज गवारे, ग्रामसेवक राजेंद्र बन, प्रल्हाद यादव, बापूसाहेब हुंबरे, ग्रा.पं. सदस्य अशोक जाधव सह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते. पुढे बोलताना आ.पंडित म्हणाले की, मतदारसंघातील अनेक गावांत विविध कामे प्रलंबित आहेत. ती विकास कामे आपल्याला मार्गी लावायची आहेत. राज्यात आपलं सरकार आहे. पाच वर्ष हे सरकार आपलं सरकार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अजितदादा पवार हे आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. त्यामुळे पाच वर्षात जास्तीत जास्त निधी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणून भैय्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला विविध कामे करायची आहेत. शिवछत्र परिवाराबरोबर मायबाप मतदार आणि तरुण कार्यकर्त्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला मला साथ दिली. मतदारांच्या खूप अपेक्षा आहेत. सर्वांच्या अपेक्षा नक्कीच पुर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नशील असणार आहेत. आपण दिलेले प्रेम हे विसरुन चालणार नाही. हे जे काही ऋण आहे याच्यातनं कधीच उतराई होणार नाही. कारण दहा वर्षापासून शिवछत्र परिवार संघर्ष करतोय आपण ते उद्दिष्ट साध्य केलं ते तुम्ही करुन दाखवलं त्याच्यामुळे याची जाणीव निश्चितपणाने संपूर्ण परिवाराला आहे. तसेच आता जिल्हा परिषद, पंचायत समिती, आणि नगरपालिकेच्या निवडणूका होतील यातही शिवछत्र परिवार आपल्या सर्वांच्या सहकार्याने वर्चस्व प्रस्थापित करेल

### धारूर बसस्थानकातील काँक्रिटीकरणाचे काम रखडले

## प्रवासी नागरिकांचे होतायत प्रचंड हाल



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर बस स्थानकाच परिसरातील काँक्रिटीकरणाचे काम सुरू करण्यात आले होते पाच सहा दिवस काम केल्याच्या नंतर गेले अनेक दिवसापासून हे काम रखडले होते त्यामुळे प्रवासी गावातील नागरिकाना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. किल्ले धारूर शहर हे मुख्य बाजारपेठेचे शहर असून या शहराला अनेक खेडे पाडे संलग्न आहेत मोठी बाजारपेठ असल्याने बस स्थानकात नेहमी गर्दी असते परंतु या ठिकाणच्या बस स्थानकात नेहमीच सुविधेचा आभाव दिसून आला आहे अनेक दिवसाच्या प्रतीक्षेनंतर बस स्थानकाच्या परिसरातील काँक्रीटीकरणाच्या कामाला सुरुवात झाली होती परंतु काही दिवसच काम चालू होते व गेल्या अनेक दिवसापासून हे काम रखडले यामुळे प्रवाशांना,विद्यार्थ्यांना उभे राहण्यासाठी जागा नाही. आवारात इतर सोयी सुविधा नाहीत.यास अनेक प्रश्न अध्याप प्रलंबित आहे. यामुळे प्रवाशाचे हाल होत आहेत. काँक्रिटीकरणाचे काम तातडीने पूर्ण होऊन प्रवाशाचे होणार हाल थांबवण्याची मागणी प्रवासी व गावच्या नागरिकांच्या वतीने करण्यात येत आहे.

# रथसप्तमीनिमित्त तरुणाईला सूर्यनमस्काराचे धडे



**बीड । प्रतिनिधी**

४ फेब्रु.२०२५ रोजी होऊन गेलेल्या रथसप्तमी दिनानिमित्त राज्यभरामध्ये विविध ठिकाणी जागतिक सूर्यनमस्कार स्पर्धा पार पडत आहेत.दिवसेंदिवस सूर्यनमस्काराचे महत्त्व समाजाच्या सर्व स्तरापर्यंत पोहोचत आहे, त्याचा परिणाम स्वरूप या स्पर्धेमध्ये दिवसेंदिवस उत्तुंग प्रतिसाद मिळत आहे. १५ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी जीतो दिल्ली पब्लिक स्कूल आणि गरुड झेप सैनिकी स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय सूर्यनमस्कार स्पर्धा पार पडल्या. सुमारे १००० मुला मुलींनी तसेच इतर योग प्रेमींनी या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले नाव करणाऱ्या योग प्रशिक्षिका योगतज्ञ श्रीमती डॉ. राधा तांबे यांचे या ठिकाणी अमूल्य मार्गदर्शन लाभले. त्यांनी सर्वांना सूर्य नमस्कारचे प्रात्यक्षिक करून दाखवले, योग्य पद्धतीने सूर्यनमस्कार कसे करावयाचे आणि आरोग्याला मिळणारे फायदे याची माहिती तिथे उपस्थित असणाऱ्या युवा पिढीला करून दिली. आतापर्यंत योगतज्ञ श्रीमती डॉ. राधा तांबे यांनी बीड, अंबड, परतुर तसेच

# अ‍ॅड प्रकाश कवठेकर यांनी दिले पाटोदा तालुक्यातील पत्रकारांना विमा संरक्षण, आ. सुरेश धस यांच्या हस्ते वाटप

**पाटोदा । प्रतिनिधी**

डोंगरकिन्ही जि प गटाचे सदस्य, बीड जिल्ह्यातील प्रतिथयश उद्योजक एक विश्वासपात्र बँक चालक ड प्रकाश कवठेकर यांनी आ सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा तालुक्यातील सर्व पत्रकारांना प्रत्येकी चार लाख विमा संरक्षण देऊन.आ सुरेश धस यांच्या हस्ते विम्याचे वाटप करण्यात आले.

पाटोदा तालुक्यात विभागिय, स्थानिक दैनिकात व काही साप्ताहिकाचे काम करणारे पत्रकार आहेत.ते इमानेइतबारे जनहितासाठी पत्रकारीता करतात,



अनेकदा बातम्या साठी हल्ला सहन करावा लागतो.तर ग्रामीण भागात बातम्या संकलीत करताना अनेक अडचणी येतात.यासाठी पत्रकारांना विम्याचे संरक्षण नसते. हेच हेरुन पत्रकारांचे मित्र,जि प सदस्य, प्रतिथयश उद्योजक, विश्वासपात्र बँक चालक ड प्रकाश कवठेकर यांनी सर्व पत्रकारांना प्रत्येकी चार लाख व एकुण दोन कोटीचा विम्याचे संरक्षण दिले आहे.आ सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकारांना हे विमा संरक्षण दिले आहे.याच विम्याचे वाटप अद्वैतचंद्र या निवासस्थानी आ सुरेश धस यांच्या हस्ते वाटप करण्यात आले याप्रसंगी ड प्रकाश कवठेकर, नायगाव चे माजी सरपंच शाहीद सय्यद ,पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा स्विय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे. ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष बबनराव उकांडे, व्हाईस ऑफ मिडियाचे पत्रकार अविराज पवार चंद्रकांत पवार,भाऊ साहेब पवार, दयानंद सोनवणे, अमीर शेख, विजय जाधव, अजिज शेख ,महेशर शेख भाजपा ता अ भागवत येवले, माजी सरपंच रविंद्र राजवण , सय्यद शफ्फु,बावणे बप्पा, पाटोदा नगरसेवक संतोष जाधव, अंमळनेर जि प गटातील

# गेवराई पंचायत समितीच्या जुन्या इमारतीला आग

## महत्त्वाचे कागदपत्रे जळून खाक

**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील पंचायत समिती कार्यालयात असलेल्या जुन्या इमारतीत आगीत महत्त्व प्राप्त कागदपत्रे जळून खाक झाली. ही घटना रविवारी सुमारास घडली. माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पोहोचून ही आग विझविली आहे. जुने टेबल, खुर्च्या, टायर, जुनी कागदपत्रे होती. ती या आगीत जळून खाक झाली आहेत. दरम्यान, अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ येऊन ही आग विझविली. उशिरापर्यंत आग विझविण्याचे काम सुरू होते. आगीचे लोळ बाहेर पडत असल्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

सदरील आग लागल्याची माहिती पंचायत समिती कार्यालयातून फोन आला होता. यामुळे तत्काळ पोहोचून आग विझविण्यात आली. परंतु, जुन्या फायली, टेबल, खुर्च्या जळाल्या आहेत. जुने गोडाऊन असल्याने इलेक्ट्रिसिटी वायर आत नाही. यामुळे आग लावल्याची शक्यता जास्त असल्याचे अग्निशमन अधिकारी यांनी सांगितले.

# संत गजानन महाराज प्रगटदिन निमित्त तीन दिवसीय उत्सव सोहळा

## भव्य मंडप, मंदीराचे सुशोभिकरण,सहयोगनगर भागातील उत्सवास मंगळवारपासून सुरूवात

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील सहयोगनगर भागातील श्री संत गजानन महाराज मंदीरात प्रगटदिनानिमित्त तीन दिवस उत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून मंगळवार (दि.१८) रोजी सामुदायिक गजानन विजय ग्रंथाच्या पारायण सोहळ्याने सुरूवात होणार आहे. तीन दिवसीय उत्सवामध्ये दररोज धार्मिक कार्यक्र माचे आयोजन करण्यात आले असून

**भव्य मंदीर उभारणी**

**गेल्या काही दिवसांपासून मंदीराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू आहे. पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले असून भव्य असे मंदीर उभा झाले आहे. भाविकांच्या सहकार्यातून आणखी देवतांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठपणा करण्यात येणार आहे.**

भाविकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन गजानन सांस्कृतिक मंडळ, सहयोगनगरच्या वतीने करण्यात आले आहे. या तीन दिवसीय उत्सवामध्ये दररोज पहाटे ५ ते ७.४५ वाजेपर्यंत श्री चा अभिषेक व आरती होणार असून दुपारी १२ वाजता आरती आणि महाप्रसाद तर सायंकाळी ७ वा. आरती झाल्यानंतर श्री गजानन महाराज प्रार्थनास्तोत्राचे सामुदायिक पठण करण्यात येणार आहे. तर दासनवमीनिमित्त श्री ग्रंथराज दासबोध पारायण दि.२१ व २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. गुरूवार दि. २० रोजी प्रगटदिनाचा उत्सव साजरा होणार आहे. दुपारी १२ वाजता महाआरती झाल्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार असून सायंकाळी ८ ते १० वाजेपर्यंत

# तब्बल २८ वर्षांनी पुन्हा भरला दहावीचा वर्ग !

## जय भवानी महाविद्यालयात १९९६ च्या बॅचचे स्नेहमिलन



**गेवराई । प्रतिनिधी**

गढी येथील जय भवानी महाविद्यालयात १९९६ मध्ये दहावी परिक्षा उत्तीर्ण झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा पार पडला. हे विद्यार्थी तब्बल २८ वर्षानंतर एकत्र आले होते. यानिमित्त आयोजीत कार्यक्रमात गुरुजनांचा सत्कार करत आठवणींना उजाळा देण्यात आला.

जयभवानी महाविद्यालयात आयोजीत या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्राचार्य वसंत राठोड हे होते. यावेळी माजी प्राचार्य श्रीमती नागणे , शेख सर, के.पी.ढाकणे, खामकर, दराडे, जरांगे, राठोड , बारगजे, बोर्डे, ढेरे, नाटकर, काकडे, श्रीमती लोमटे, श्रीमती दाभाडे, श्रीमती मुंढे तसेच बंडू बारगजे हे देखील उपस्थित होते. दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सर्व गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी शाळेने दिलेल्या शिदोरीवरच आमचे मार्गक्रमण सुरु असून शिक्षकांनी दिलेले धडे आयुष्यात पदोपदी उपयोगी पडत असल्याचे सांगितले. सुत्रसंचलन मनिषा आव्हाड यांनी केले. माजी विद्यार्थ्यांकडून शाळेसाठी कपाट देखील भेट देण्यात आले.

माजी विद्यार्थ्यांचा हा मेळावा यशस्वी करण्यासाठी मेघा नागरगोजे, आम्रपाली निसर्गंध, रोहिणी कुलकर्णी, नवल कुमार ढाकणे, दीपक दुधाळ, दीपक बोर्डे, सचिन ढेरे, विष्णू घोंगडे , आशा अलगुडे, ज्योती शिंदे तसेच पुष्पा नागरगोजे यांनी सहकार्य केले. स्नेहभोजनानंतर वंदे मारतम् गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# गुत्तेदार आणि उपविभागीय अभियंता यांच्यावर गुन्हा का दाखल करु नये ?

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील उमापुर - मालेगाव रोडचे डांबरीकरणाचे काम मागील वर्षभरापूर्वी झाले या रोडवरील कापसे वस्ती नजिक रोडवर, रोडला जोड देण्यात आला हा जोड देते वेळी सपाट केला नाही आणि शेतावरील बांधाप्रमाणे टेकाड केले.

अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभाग गेवराई यांना तोंडी माहीती देऊन देखील सबंधित अधिकारी यांनी जाणिवपूर्वक दुर्लक्ष केल्याने मागिल सहा महिन्यांपूर्वी एक कार वेगात जात असतांना याच रोडवरील टेकडीवरून उडाली आणि थेट शेतात जाऊन फसली यावेळी तेथील शेतकरी यांनी प्रसंगावधान दाखवल्यामुळे अनर्थ टळला. परंतु दि.



१४ रोजी रात्री ८ च्या सुमारास मालेगाव येथील मित्राला दुचाकीवरुन घरी सोडण्यासाठी जात असतांना अर्धपिंप्री येथील साहेबराव आबासाहेब रोकडे यांचा याच उमापुर - मालेगाव रोडवरील टेकडीवरून गाडी उडाल्याने गाडीवरचा ताबा सुटला व त्यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.



*ष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडी गावचे सरपंच मा. राजेभाऊ फड यांच्या वतीने कन्हेरवाडी येथिल अनंत वैजनाथ मुंडे यांच्या मूलीच्या विवाहासाठी 10000 रू मदत मुलीचे मामा जयराम वाल्मीक फड यांच्याकडे सुपुर्द करण्यात आली, यावेळी ग्रा.प. सदस्य प्रल्हाद गित्ते, मधुकर मुंडे टेलर, लक्ष्मण खांडे,अन्नासाहेब बहिरे, महादेव मामा मुंडे, अरुण मुंडे, राजु भरत फड, समाधान मुंडे आदि ग्रामस्थ उपस्थित होते.*

# श्री नारायण विद्यालयात संत सेवालाल जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण मा. व उ. मा. विद्यालयात श्री संत सेवालाल महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख म्हणून श्री नारायण विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष श्री महादेवराव काळे (अण्णा), संस्थेचे सचिव तथा प्राचार्य श्री अमोल काळे सर उपस्थित होते. प्राचार्य तथा सचिव श्री अमोल काळे सर यांनी संत सेवालाल महाराज यांच्या जीवन कार्याविषयी बहुमोल अशी माहिती दिली. सूत्रसंचालन श्री चव्हाण युवराज सर यांनी केले आभार प्रदर्शन शेख सर यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक प्राध्यापक श्री अशोक घरत सर श्री मस्के सर , श्री पौळ डी.बी, श्री करपे सर, श्री इनकर बी.जे, श्री चौधरी पी. बी, श्री रकटे एन. पी ,सौ. भुतावळे बि. आर ,सौ. मस्के मॅडम, कदम एस .व्ही, पवार पी .एल, श्री मुरमुडे ए .एन , रकटे बी. आर , तसेच विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




